**सं.फौ.प्र.क्र./२२८/२०१८**
**सर–वि.– सचिन**
**नि.क्र. ११ वर पुढे सुरु**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०६
मी शपथेवर खरे सांगतो की,
नावः निळकंठ सदाशिव सयाम, वय–५५ वर्ष,
कामधंदा –मजुरी, रा. बोदरा, तह. साकोली, जि. भंडारा.

**साक्षीदाराचा सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री. एन. के. गणवीर यांच्यामार्फत सुरुः–**

मी आरोपीला ओळखतो. तो माझा मुलगा आहे. घटनेबद्दल मला काही माहित नाही. पोलीसांनी माझे बयाण घेतले नाही.
सरतपास समाप्त.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने न्यायालयाच्या परवानगीने साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

आता मला माझ्या बयाणातील अधोरेखांकित भाग वाचुन दाखविण्यात आला. मी पोलीसांना तसे काही सांगितले नाही. पोलीसांनी तसे माझ्या बयाणात का लिहीले याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.
पुढील तपास समाप्त.

**उलटतपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. एस. सी. बोरकर यांनी नाकारला.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत

(नि.प्र.तळणीकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, साकोली
२७/०२/२०२४